



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १६१ वा गुरूवार दि. ०७ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# ट्रम्प आपल्या देशाची खिल्ली उडवतायत; उद्धव ठाकरे ट्रम्प बाबत सरकारवर संतापले...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

ट्रम्प आपल्या देशाची आणि नरेंद्र मोदींची अक्षरशः थट्टा करताय आणि खिल्ली उडवताय. आपण त्यांना काही उत्तरसुद्धा देऊ शकत नाहीयत. त्यांना जाब विचारायचं सोडाच पण आपण त्यांना उत्तर देऊ शकत नाहीयत. कारण या देशाचं सरकार चालवतंय कोण? शिवसेनेचा वर्धापनदिन १९ जूनला झाला तेव्हा मी माझं मत व्यक्त केलं होतं की, आज आपल्या देशाला पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री आणि गृहमंत्र्यांची गरज आहे. अशी टीका उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर तथा भाजपवर केली आहे. ठाकरे हे तीन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के ट्रम्प टॅरिफ कर लादला आहे. तसेच बिहार निवडणुकीतील मतदार याद्यांबाबत आणि ईव्हीएमवरून त्यांनी केंद्र सरकार आणि केंद्रीय निवडणूक आयोगावर निशाणा साधला. त्यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर सरकारवर तोफ डागली. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, आजचे पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि गृहमंत्री ते भाजपचे आहेत. कारण ते प्रचारामध्ये जातात. देशाचे पंतप्रधान असते तर ते पहलगामला गेले असते पण ते बिहारला गेले. हे सर्व भाजपचे प्रचारमंत्री आहेत. हे सरकार असफल, अपयशी आणि असाह्य आहे. त्यांना कोणतीही परराष्ट्रनीती यांची अपयशी ठरली आहे. कोणतंही असं खंबीर धोरण नाही. प्रत्येक राज्याच्या निवडणुका वेळेनुसार होतील. बिहारमध्ये मतदार याद्यांचा घोळ झालाय. स्वत:ची ओळख मतदारांनी पटवून द्यायची असं त्यात आहे. म्हणजे देशात अघोषित एनआरसी () लागू झाली आहे का? सीए आणि एनआरसीवरुन विषय पेटला होता. दिल्लीत त्यावरुन आंदोलन देखील झालं होतं. तुम्ही तुमची ओळख पटवून द्या, असं म्हटलं होतं



आणि त्यामुळे वाद झाला होता. आता निवडणूक आयोगाने त्यावर उत्तर द्यावं, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी आयोगाला खडसावलं आहे. ईव्हीएमवर संभ्रम असताना व्हीव्हीपॅट काढलं, मग निवडणूक घेता कशाला. कोण जिंकलं? कोण हरलं? थेट जाहीर करा. आमचं मत आम्हाला कळत नाही. रजिस्टर कुठे होतं हे कळत नाही. बॅलेट पेपरवर मतदान करताना ठसा लावल्यानंतर माझं मत कुठे आहे कळायचं. आता व्हीव्हीपॅट काढलं जात आहे. मग निवडणूक घेताच कशाला, असा अचूक निशाणा उद्धव ठाकरे यांनी यावेळी साधला.

# शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी ...केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश...

## २५ आणि .२६ जुनच्या अतिवृष्टीत नुकसान झालेल्या ९०३८३ शेतकऱ्यांना मिळणार ७४ कोटींची आर्थिक मदत...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हयात २५ आणि २६ जून रोजी ढगफ ुटी सदृश्य पावसामुळे जिल्ह्यातील आठ मंडळ क्षेत्रामधील ८७ हजार ३९०.२ हेक्टर पिकांचे नुकसान झाले होते .. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठ पुराव्याला यश आले असून सरकारने बाधित शेतकऱ्यांसाठी ७४ कोटी ४५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे बुलढाणा लोकसभा मतदारसंघात २५ व २६ जून रोजी ढगफुटीसदृश्य व अतिवृष्टीमुळे ८७ हजार ३९०.२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते ९० हजार ३८३ शेतकऱ्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला होता. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी धीर देत शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली होती यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार संजय रायमुलकर होते त्यानंतर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली व शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबतची दाहकता आणि फोटोग्राफ दाखवुन त्यांच्या लक्षात आणून दिली व या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. शासनाने ६ ऑगस्ट रोजी परीपत्रक काढून बुलढाणा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी ७४कोटी ४५ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर मतदारसंघात सरासरी ११२ मिमी पावसाची नोद झाली होती यामध्ये मेहकर मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यांना तब्बल ६६ कोटींची नुकसान भरपाई मिळणार आहे. मेहकर मतदारसंघातील एकूण ६५,६०१ हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले असून ६६ हजार नुकसानग्रस्त शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये जमीन खरडून जाणे,फळबागांचे नुकसान आणि गाळ साचल्यामुळे पीक नष्ट होणाऱ्या सुमारे ६ हजार शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे.या तातडीच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त करत मतदारांना दिलेला शब्द पाळला






असल्याच्या प्रतिक्रिया केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केल्या असून मतदार संघातील शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहिर झाल्याबद्दल शेतकऱ्यांनीही समाधान व्यक्तकेलेआहे.

# सावधान! कौरव अजून मेले नाहीत...

## संपादकीय लेख

व्यर्थ गडबड आणि व्यर्थ बडबड ही चंचल माणसांची खासियत आहे. सर्व काही झटपट मिळालं पाहिजे. सकाळी पेरलं की रात्री उगवलं पाहिजे. गाडी, बंगला, नोकरचाकर ही स्वप्नं हिंदी सिनेमाने बहाल केली. हे सारं मृगजळ आहे. वास्तव मात्र वेगळं आहे. सतत नव्याचा शोध वास्तवापासून दूर नेतो. खरंतर वास्तवातच नव्याचा शोध घेता येतो. नवीन वर्ष उजाडलं की प्रत्येकाला नव्याचा ध्यास लागतो. पण नवं म्हणजे वास्तवाच्या परिघाबाहेर जाऊन काहीतरी भन्नाट करण्याचा अट्टहास अट्टहासाने केलेली गोष्ट मेणबत्तीच्या जगण्यासारखी वितळून जाते. उदाहरण द्यायचं तर सहा दशकांपूर्वीची सिनेमातली हिंदी गीतं आजही जिवंत आहेत. अलीकडच्या युवावर्गाच्या मनातही ती जाऊन बसली आहेत. परंतु नव्या गाण्याचं वय एक महिनाही नसते. असं का? उत्तर आहे, अट्टहास. मूळ तत्वाशी ज्याने फारकत घेतली त्याच्या कुठल्याही निर्मितीला पायाच नसतो. प्रत्येक गोष्टीला कारण असते. कारणाशिवाय केलेली निर्मिती ही तकलादू असते. मग नव्याचा शोध म्हणजे नेमकं काय? तर मूळ नैसर्गिक तत्वापासून आपण नेमके कुठे चुकतो आहोत याचा सतत शोध घेत राहणं. जुनं आणि नवीन हा खरंतर भ्रम आहे. एखादी वस्तू चकचकीत रॅपर किंवा आकर्षक छपाई केलेल्या बॉक्समध्ये पॅक केली की नवीन होते. पण वस्तू मात्र तीच असते. सध्याच्या काळात आपण रॅपरवर भाळलो आहोत. जुन्याच गोष्टी नव्या रॅपरमध्ये पॅक करून आपण जगासमोर मांडतो आहोत. मराठी सिनेमा क्षेत्रात ङ्गहरिश्चंद्राची फॅक्टरीफहा चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्यावरचा चित्रपट नव्या पद्धतीने, नव्या अंदाजाने जगासमोर ठेवल्यामुळे लोकांना तो आवडला. मूळ गोष्टींचा पाया जुनाच आहे. ङ्गबालगंधर्वफह चित्रपट त्याच पद्धतीने लोकांना आवडला. नुकताच आलेला पु.ल.देशपांडेंवरचा ङ्गभाईफ हा चित्रपट किंवा ङ्गआनंदीबाई जोशीफ हाही चित्रपट त्याच धाटणीचा आहे. हे झालं चित्रपटांबद्दल. नाटकांमध्येही ङ्गचि. सौ.कां रंगभूमीफ हे नाटक संगीत नाटकांची पूर्वापार परंपरा जपणारं आहे. नव्या रॅपरमुळेच ते लोकांना आवडलं. पण याचं केवळ रॅपरच आकर्षक नाही तर नाटकाची संहिताही मूळ तत्वाशी एकनिष्ठ असल्याने हे नाटक रसिकांना भावलं. या गतीमान काळात अनेकांचा स्व-संवाद संपुष्टात येत आहे. मोबाइलमध्येच मिनी टीव्हीने शिरकाव केल्यामुळे मनाला अस्वस्थ करणाऱ्या गोष्टींचा सततचा मारा मन-बुद्धीवर होत राहिल्याने स्वत:च्या विचारांची नाळ तुटत चालली आहे. रस्त्यावर, प्रवासात, रिकाम्या वेळी कानाला हेडफोन लावून सतत गाणी, चित्रपट पाहत असल्यामुळे मानत निर्माण होणारी स्व-विचारांची स्पंदनंच आटत चालली आहेत. या स्पंदनांना पुन्हा चेतवणं म्हणजे एक प्रकारची नवनिर्मिती असल्याचंच समजावं. आज शहरामध्ये सर्वत्र सिमेंटचं रान माजलंय. तीर्थप्रसादाइतकीच जमीन पाहायला मिळते. मग झाडं लावायची कुठे? सिमेंटखाली दफन झालेल्या मातीला जीवदान मिळालं पाहिजे, हा नवा विचार नव्या वर्षात प्रत्येकानेच करायला हवा. इलेक्ट्रॉनिक्सने खूप मोठी मजल गाठली आहे. त्याचं स्वागत आणि कौतुक करावं तितकं कमीच. पण आजचा तरुणवर्ग याला पुरता शरण गेला आहे, त्याच्या अधीन झाला आहे. माझ्या २१ वर्षीय मुलीचा मोबाइल फक्त चार तास लपवून ठेवला तर त्या चार तासात ती कमालीची अस्वस्थ झाली होती.




हा अस्वस्थतेचा आजार आता प्रत्येकाच्या घरात शिरला आहे आणि त्यावर उपचार करणं म्हणजे नवा विचार करणं असे मत बनू शकतं. नव्या वर्षात मानवी संवादावर अधिक भर दिला पाहिजे. ङ्गअजेयफ नावाच्या तरुणांच्या एका संस्थेने नुकताच ङ्गस्वसंवादफनावाचा परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात मुलाखत घेणाऱ्यापासून सहभागी होणाऱ्यांचा वयोगट २२ ते २८ वर्ष असा होता. तरुणांच्या या संस्थेला परिसंवादाची गरज वाटावी ही एक लक्षणीय बाब आहे. स्वत:शी जेव्हा संवाद तुटतो तेव्हा माणसाची निर्जिव मशीन होते. हाती स्मार्टफोन आल्यामुळे वाचनाचा छंद संपुष्टात आला आहे. यातून स्मार्टपणे कशी सुटका करून घेता येईल, असा नवा विचार नव्या वर्षात करायला हवा. प्रसिद्धीसाठी निर्मिती करणं हा गोड गैरसमज मनामनांत मुरत चाललाय. फ ेसबुक आणि व्हॉट्सअॅपमुळे आपण प्रसिद्ध होऊ आणि आपली निर्मिती व्हायरल होईल हा भ्रम घट्ट रुजत चालला आहे. संथ गतीने प्रचंड चिंतन आणि मननाच्या पायऱ्या चढतच माणूस यशाच्या शिखरापर्यंत पोहोचतो. एखाद्या प्रसिद्ध, नामवंत व्यक्तीने आपल्या डोक्यावर हात ठेवला म्हणून चमत्कारिकरित्या आपला उदय होऊन तडाखेबाज प्रसिद्धी मिळेल या गैरसमजाला वेळीच संपवणं म्हणजे नव्या वर्षात नवा विचार करणं होईल. आपण कुठल्या छुप्या षडयंत्राचे शिकार तर बनत नाही आहोत ना, याचं भान ठेवण्याची वेळ नक्कीच आली आहे. पूर्वी वृत्तपत्रातून शैक्षणिक क्लासेसच्या पानभर जाहिरात झळकायच्या. आता रोज इमारतींचे फोटो असलेल्या आणि आलिशान घरे कशी स्वस्त्यात मिळत आहेत याच्या जाहिरातींचा सुळसुळाट झाला आहे. घर राहण्यासाठी की प्रदर्शनासाठी, या प्रश्नाचं उत्तर शोधणं म्हणजे नव्या वर्षाचा विचार असेल. भारतीय मातीतली जडणघडण भारतीयच राहिली पाहिजे.फॅशन आणि स्टेटससारख्या भ्रामक कल्पनांमागे वाहवत जाणं जे जे सोडतील त्यांची मन:शांती आणि शारीरिक आरोग्य एखाद्या बहरलेल्या झाडासारखं राहिल. सावधान! कौरव अजून मेलेले नाहीत. त्यांचा शकुनीमामा अद्याप जिवंत आहे. फक्त त्यांचे कपडे बदलले आहेत. त्यांना ओळखून त्यांच्या द्युतात सहभागी न होणं म्हणजे गुढीपाडवा खऱ्या अर्थाने साजरा करणं होईल.




# दारूच्या नशेत पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ

**जनसंचलन/ शेगाव**

पत्नीवर दारूच्या नशेत अत्याचार आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात पतीविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ मार्च रोजी दुपारी, मुंबईतील पनवेल येथील मालेवाडी येथील अपेक्षा कॉम्प्लेक्समध्ये घडली. याप्रकरणात बबिता भीमराव मिसाळ (वय ३५, रा. अपेक्षा कॉम्प्लेक्स, यांनी ६ ऑगस्ट रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली. पुंजाजी मिसाळ (रा. किन्ही सवडत, ता. चिखली, जि. बुलडाणा, सध्या रा. अपेक्षा कॉम्प्लेक्स, पनवेल) याने



किरकोळ कारणावरून दारूच्या नशेत पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केला; तसेच तिला व तिच्या नातेवाइकांना जीवे मारण्याची धमकी दिली. तक्रारीत असा प्रकार गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कोल्हापूरात ठाकरे गट आक्रमक...

## महापालिकेला घेराव, जिल्हाप्रमुख म्हणाले, पालिकेत भ्रष्टाचाराची स्पर्धा

**कोल्हापूर :** कोल्हापूर महानगरपालिकेत गेल्या काही दिवसांत वाढत्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांनी शहरात तणाव निर्माण झाला आहे. राज्यभरात भ्रष्ट महानगरपालिका म्हणून कोल्हापूरची ओळख होऊ लागली आहे. त्यामुळेच शिवसेना ठाकरे गटाने या भ्रष्टाचाराच्या विरोधात महापालिका कार्यालयाला घेराव घालत आंदोलन केलं आहे. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात ८५ लाखांचा ड्रेनेज घोटाळा, १०० कोटी रुपयांच्या रस्तेकामातील भ्रष्टाचार, गांधी मैदानातील ५ कोटींचा घोटाळा आणि स्ट्रीटलाइट घोटाळा यांसह महापालिका भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणांविरोधात निदर्शने करण्यात आली.ठाकरे गटानं महापालिका अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी भ्रष्टाचारात सहभागी असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आंदोलना दरम्यान कोल्हापूरच्या गांधी मैदान ते महापालिका दुचाकी आणि रिक्षा घेऊन रॅली काढण्यात आली. ही रॅली महानगरपालिका इमारती जवळ आल्यानंतर सर्व रिक्षा आणि दुचाकींनी महानगरपालिकेला चारही बाजूंनी घेराव घातला. या घेराव आंदोलनात शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करून पोस्टर्ससह भ्रष्टाचाराविरुद्ध निदर्शन केली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ यांनी या आंदोलनाचे निवेदन महापालिका प्रवेशद्वारावरच स्वीकारले.यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले म्हणाले की, महापालिकेत भ्रष्टाचार वाढला त्यात जास्त भ्रष्टाचार करण्याची स्पर्धा चालू आहे. महापालिका आयुक्तांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करत यात समाविष्ट लोकप्रतिनिधींची नावे जाहीर करावीत अन्यथा आयुक्त मॅडम यांनी राजीनामा द्यावा असेही यावेळी इंगोले यांनी सांगितले. तर भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई न झाल्यास पुढील आंदोलन अधिक तीव्र होण्याचा इशाराही यावेळी दिला आहे.ठेकेदारांनीही कोल्हापुर महापालिकेतील अधिकाऱ्यांना टक्केवारी दिल्याचा खुलासा केला असून या भ्रष्टाचाराचा शोध घेण्यासाठी संबंधित विभागांत रिपोर्ट पाठवला आहे. ठेकेदारांनी अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून काम न करता कागदोपत्री बिलं



मंजूर केली असल्याचा आरोप केला आहे. या सर्व प्रकरणांमुळे कोल्हापुर शहरातील प्रशासकीय प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून नागरिकांना त्वरित आणि पारदर्शक पावले उचलली जाण्याची अपेक्षा वाढली आहे.कोल्हापूर महापालिकेतील घोटाळ्यांवर प्रशासन सतत निष्क्रिय असल्याचा आरोप करून ठाकरे गटाने महापालिकेत भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करा आणि लोकप्रतिनिधींची नावे सार्वजनिक करा, अशी मागणी केली आहे. या आंदोलनामुळे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. त्यामुळे महापालिकेचे कामकाज यापुढे कसे राहते?, प्रशासन कोणा कोणावर कारवाई करते? हे देखील पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

---

# लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्या; पालकमंत्र्यांचे विभागप्रमुखांना निर्देश...

**नागपूर :** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध विभागांना उपलब्ध करून दिलेल्या निधीतून विविध योजना साकारल्या जातात. यातून नाविन्यपूर्ण योजना आकारास येतात. या कामांमधून विविध ठिकाणी असलेल्या इतर व्यावसायिक आस्थापनातून अप्रत्यक्षपणे स्वयंरोजगाची निर्मिती होत राहते. जिल्हा वार्षिक योजनेतील कामे निश्चित करताना यापुढे ज्या भागात ही कामे प्रस्तावित केली आहेत त्या भागातील लोकप्रतिनिधींना विभाग प्रमुखांनी कल्पना देऊन कामे प्रस्तावित करण्याचे निर्देश राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत



यापूर्वी ज्या विभागांकडे निधी वर्ग करण्यात आलेला आहे त्यांनी कोणत्याही स्थितीत येत्या १५ ऑगस्ट पर्यंत त्या-त्या योजनांसाठी शासन निर्णयानुसार निधी खर्च करा, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. लोकाभिमुख प्रशासनासह सर्व सामान्य जनतेला शासकीय योजनांचा सुलभ लाभ पोहोचावा यासाठी आपण कटीबद्धता स्वीकारली आहे. सर्वांसाठी घरे ही महत्वाकांक्षी योजना असून जिल्हा प्रशासन, मनपा, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा परिषद यांनी परस्पर समन्वय ठेवून पट्टे वाटप मोहीमेला अधिक गती देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.येत्या काही दिवसांत विविध सण आणि उत्सवासह सर्वांच्या भक्तीचा गणेशोत्सव सुरू होत आहे. विविध मंडळांना त्यांना आवश्यक त्या परवानग्या, सुरक्षितता मिळावी, गणपतीचे विसर्जन श्रद्धापूर्वक करता यावे यासाठी कृत्रिम तलावाची निर्मिती ही कामे मनपाने युद्धपातळीवर केली पाहिजे. मनपाच्या प्रत्येक झोननिहाय एक खिडकी योजना यासाठी सुरू करण्यास त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलिस अधीक्षक, एनएमआरडीए, पोलिस आयुक्त यांनी एकत्रित येऊन या गणेशोत्सवात अधिक सूत्रबद्ध होऊन नियोजन करावी, असे त्यांनी सांगितले.

# संस्कारांची राखी!, विशेष भगिनींच्या हातांनी विणला प्रेमाचा धागा



**धुळे :** रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणीच्या पवित्र आणि अतूट नात्याचा सण. या सणाला प्रेमाच्या धाग्याने अधिक घट्ट करण्यासाठी धुळ्यातील संस्कार विशेष मुलींचे बालगृह आणि कार्यशाळा येथील अनाथ आणि विशेष मुलींनी पुढाकार घेतला आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी या मुलींनी आपल्या कोमल हातांनी आणि कल्पकतेने अत्यंत आकर्षक आणि सुंदर राख्या तयार केल्या असून, या राख्या केवळ सजावटीची वस्तू नाहीत, तर त्या त्यांच्या आत्मनिर्भरतेच्या स्वप्नांचे आणि परिश्रमाचे प्रतीक आहेत.,संस्कार बालगृहाच्या कार्यशाळेत सध्या उत्साहाचे आणि निर्मितीचे वातावरण आहे. रंगीबेरंगी मणी, रेशमाचे धागे, कुंदन आणि विविध सजावटीचे साहित्य वापरून या मुली एकाग्रतेने राख्या बनवताना दिसत आहेत. प्रत्येक राखीमध्ये त्यांचे कष्ट, प्रेम आणि कलात्मकता ओतलेली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ राख्या बनवणे नसून, या मुलींची बौद्धिक क्षमता वाढवणे, त्यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे, अशी माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.या मुलींनी तयार केलेल्या राख्या विविधरंगी आणि मनमोहक डिझाइनमध्ये उपलब्ध आहेत. या राख्यांच्या विक्रीतून मिळणारा निधी थेट या मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांसाठी वापरला जातो. त्यामुळे, बाजारातून एक राखी विकत घेणे म्हणजे केवळ सण साजरा करणे नाही, तर या विशेष भगिनींच्या भविष्याला हातभार लावणे आहे. हा उपक्रम समाजातील दुर्लक्षित घटकांप्रति सहानुभूती निर्माण करतो आणि इतरांनाही प्रेरणा देतो.रक्षाबंधनाचा सण साजरा करताना आपण अनेकदा महागड्या राख्या खरेदी करतो. पण यावर्षी, आपल्या भावाच्या मनगटावर या विशेष मुलींनी बनवलेली संस्कारांची राखी बांधून आपण दुहेरी आनंद मिळवू शकतो. एकीकडे भाऊ-बहिणीचे नाते अधिक घट्ट होईल, तर दुसरीकडे या मुलींच्या चेहऱ्यावर हसू आणल्याचे समाधान मिळेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भास्कर जाधवला संपवणं तुमच्या बापाचं काम नाही, उद्धव ठाकरेंचा खंदा शिलेदार कडाडला





**रत्नागिरी :** गेल्या आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पालकमंत्री उदय सामंत यांच्या पुढाकाराने गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथे पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. त्याच ठिकाणी आज भास्कर जाधव यांनी जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी शिंदे सेनेच्या शिलेदारांना थेट इशारा दिला आहे. इथली खोतकी भास्कर जाधवने संपवली ती सर्वांना नडते आणि म्हणून पहिल्यांदा काय करायचं तर भास्कर जाधवला बाजूला करायचं आणि मग बाकीच्यांना, असे शिवसेनेच्या व्यासपीठावरुन म्हणण्यात आले. यावर आता भास्कर जाधवांनी प्रत्युत्तर दिले आहे.भास्कर जाधव म्हणाले, ही अशी माणसं जेव्हा येतात तेव्हा त्यांना सांगा तुम्हीच सांगा (प्रकाश भोसलेंना उद्देशून) भास्कर जाधवला संपवणं तुमच्या बापाचं काम नाही लक्षात ठेवा, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधारी नेत्यांना सुनावले आहे. भास्कर जाधव यांनी आज रामदास कदम यांच्यावर टीका केली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आता या मतदारसंघात जाधव विरुद्ध कदम असा संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे.मला गर्व नाही मी कधीही मोठेपणा केला नाही अजिबात नाही पण भल्याभल्यांना सांगतो ते मी तुम्हाला सांगतो शेवटच्या क्षणापर्यंत भास्कर जाधव पाठ जमिनीला लावणार नाही. आता सगळ्यांबरोबर संघर्ष करणार आहे सोडणार नाही कोणाला येथील खारवी समाजाचे सभागृह बांधले आता ते सभागृह पाडण्यासाठी २०२४ च्या जूनमध्ये पंचनामा झाला आणि आणि जिला तुम्ही डोक्या उचलून घेतलं तिच्याच नवऱ्याने ही तक्रार केली आहे हे ऐकून ठेवा आता मी कोणालाही सोडणार नाही सगळ्यांची कुंडलीच काढणार आहे एकेकाची असे शब्दात भास्कर जाधव यांनी पक्ष सोडून गेलेल्या सूचक इशारा दिला आहे.आता मी ठरवलंय संघर्ष करायचा काय करायचं ना अशी ही साद त्यांनी कार्यकर्त्यांना घालत त्यांचाही कौल घेतला जे कोणी गेले त्यांना धडा शिकवायचा ना असं सांगत. त्यांनी रामदास कदम यांच्यावर जहरी टीका केली आहे. त्या रामदास कदमच्या यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे तो वेडा झाला आहे तुम्हाला माहिती आहे की नाही आणि आता रामदास कदम नाही म्हणायचं तर बामदास छमछम मी तर रामदास कदम बाबत फार काही बोलत नाही असं सांगत जहरी टीका केली आहे.राष्ट्रवादी येण्यासाठी रामदास कदम आपल्या पाया पडले व मला विरोध करू नको मला राज्यमंत्रीपद देत आहेत पण मला हवय कॅबिनेट मंत्रीपद पण मी म्हणालो मी कोणाला विरोध करणार नाही तुझ्या नशिबात असेल तर तुला मिळेल माझ्या नशिबात असेल तर मला मिळेल असं सांगत दुसरा एक किस्सा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातला आहे असं सांगत सहज म्हणून मला त्यांनी भेटायला बोलावलं आणि मी गेलो यावेळी रामदास कदम रडत होते अशी त्यांची रडण्याची ॲक्शन करत हा बामलाव्या हा बंगाली बाबा मला वाटले याच्या अंगात आलं की काय आणि म्हणाले माझे संपले सगळे आता पोरगा तुमच्या पदरात टाकतो संभाळा...तू माझ्या पाया पडलास मी तुझ्या पाया नाही पडलो या खाजगीतल्या गोष्टी बोलायचं नसतात पण तुम्ही जेव्हा चार वेळा बोलता तेव्हा एकदा बोलावं लागतं असेही भास्कर जाधव यांनी रामदास कदम यांना सुनावला आहे.

भास्कर जाधव यांनी रामदास कदम यांच्यावर केलेल्या टीकेला आता रामदास कदम कशाप्रकारे प्रत्युत्तर देतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# उद्धव ठाकरेंना पुन्हा धक्का, विश्वासू शिलेदाराचा राजीनामा...




**नवी मुंबई :** महाराष्ट्रातील राजकीय भूकंपाची मालिका थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते विठ्ठल मोरे यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र तूर्तास त्यांनी कुठल्याही पक्षात जाणार नसल्याचे सांगत माजी खासदार राजन विचारे यांच्या मनमानीला कंटाळून राजीनामा दिला असल्याचे सांगितले. मोरे हे नवी मुंबईतील माजी नगरसेवक आहेत.नवी मुंबईतील बेलापूर विधानसभा मतदारसंघातून एका माजी नगरसेवकाचा अपवाद वगळता सर्व नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. आता त्यात ठाकरेंचे विश्वासू आणि ज्येष्ठ नेते विठ्ठल मोरे यांची भर पडते, की ते अन्य पक्षात प्रवेश करणार, हे काही दिवसात स्पष्ट होईल.नवी मुंबईतील कोणतेही पक्षीय निर्णय घेताना राजन विचारे आपल्याला विचारात न घेता परस्पर निर्णय घेतात, आपण बेलापूर शहराध्यक्ष पदासाठी पाच नावांची शिफारस पक्षश्रेष्ठींकडे केली होती, मात्र त्यातून एकाही नावाचा विचार केला गेला नाही. विचारेंनी आपल्या मर्जीतील व्यक्तीची निवड पक्षश्रेष्ठींना अंधारात ठेवून केली, असा आरोप विठ्ठल मोरेंनी राजीनामा देताना केला.मागील जिल्हा प्रमुख आणि इतर पदांवरील नियुक्त्या राजन विचारे यांनी मनमानी पद्धतीने करत आपल्या मर्जीतील व्यक्तींना स्थान दिलं. अनेकांचे पक्षासाठी काहीही काम नसताना, आपल्याशी कोणतीही चर्चा न करता पदावर घेऊन पक्षाची हानी केली. विचारे यांनी कार्यक्रमाला तीन-चार तास उशिरा येऊन लोकांची नाराजी आपण ओढवून घेतली, तरी मी पक्ष बांधून ठेवला, असा दावा विठ्ठल मोरे यांनी केला आहे.एका पत्रात त्यांनी अत्यंत गंभीर बाब लिहिताना म्हटलं, की शिंदे गटात न गेल्याने आपल्या हॉटेलवर रात्री ३ वाजता धाडी टाकल्या गेल्या, मात्र तरीही आपण डगमगलो नाही, पक्षाचे काम प्रमाणिकपणे केले. मात्र जे काम एकनाथ शिंदे करु शकले नाहीत, ते नवी मुंबईतून पक्ष संपवण्याचे काम राजन विचारे करत आहेत, असा आरोपही मोरेंनी केला.एकनाथ शिंदेंनी पक्ष सोडल्यानंतरही राजन विचारे ठाकरेंसोबत राहिले. यावेळी पक्षश्रेष्ठींना टाकलेल्या विश्वासाचा गैरफायदा विचारे घेत असल्याचा गंभीर आरोप मोरे यांनी केला. आपण राजीनामा उद्धव ठाकरेंना पाठवला असून ते याबाबत जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल, आपण कोणत्याही पक्षात जाणार नसून शिवसैनिक म्हणूनच काम करणार असल्याचं त्यांनी पत्रात म्हटलं आहे.दरम्यान, यावर आता ठाकरे पक्षाचे संपर्कप्रमुख एम के मढवी यांनी तिखट प्रतिक्रिया दिली आहे. मढवी म्हणतात की मोरे आमचे ज्येष्ठ आणि वडीलधारे नेते आहेत. त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावे मात्र ते तसे न करता लहान मुलासारखे वागतात. पक्षाच्या वरिष्ठांनी यापूर्वीच नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना संधी देऊन ज्येष्ठ नेत्यांनी त्यांना मार्गदर्शन करावे आणि पक्ष वाढवावा असे सांगितले होते. तरीही मोरे अशा प्रकाराचा हट्ट का धरतात? असा प्रश्न मढवींनी विचारला. मोरेंनी राजन विचारेंवर बोलताना विचार करावा. जिल्हा प्रमुख असताना अशा प्रकाराच्या नियुक्त्या आपणही केल्या होत्या, मात्र त्यात कुणीही आक्षेप घेतला नाही. बेलापूर मतदारसंघाचं आपण नेतृत्व करता, मात्र बेलापूरमध्ये जेमतेम एक माजी नगरसेवक शिल्लक आहे, एक मुख्य पदाधिकारी राहिला नसून पूर्ण शिवसेना शिंदे गटात गेली, आपले नेतृत्व चांगले होते आणि आपण पक्षवाढीसाठी काम केले, मग सर्वांनी पक्ष सोडण्याचे कारण काय आहे? असा प्रश्न मढवींनी विचारला.

याबाबत उद्धव ठाकरे योग्य निर्णय घेतील. त्यांचा निर्णय आम्हाला बंधनकारक असेल, असेही मढवी म्हणाले. आता पक्षश्रेष्ठी विठ्ठल मोरे यांच्या राजीनाम्याबाबत काय निर्णय घेतात, तो निर्णय मोरे मान्य करतील की आपल्या राजीनाम्यावर ठाम राहतील. कोणत्याही पक्षात जाणार नाही असे बोलणारे मोरे शब्दावर ठाम राहतात की दुसऱ्या पक्षाची कास धरतात हे थोड्या दिवसातच स्पष्ट होईल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोठा अधिकारी होण्याचं स्वप्न अधुरं; एका दगडाने केला करणचा घात, आई-वडिलांचा आक्रोश...

**वाशिम :** वाशिममध्ये एका १७ वर्षांच्या मुलाचा अपघाती मृत्यू झाला आहे. वाशिम जिल्ह्यातील पेडगाव येथे ही धक्कादायक घटना घडल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली असून अशा प्रकारे एका होतकरु मुलाचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. हा मुलगा मजुरी करायचा आणि आपलं शिक्षणही पूर्ण करत होता. या विद्यार्थ्याच्या डोक्यावरून ट्रॅक्टरचे चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना वाशिम जिल्ह्यातील पेडगाव येथे आज दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडल्याची माहिती आहे.



करण गजानन गोडघासे असं मृत्यू झालेल्या १७ वर्षीय युवकाचे नाव असल्याची आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, वाशिमच्या रिसोड तालुक्यातील पेडगाव येथे राहणाऱ्या आणि अकरावीत शिक्षण घेणाऱ्या करण नामक विद्यार्थ्याचे वडील गजानन गोडघासे मालवाहू वाहन चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दिवसभर राब राब राबून वडील कुटुंबाचा गाडा हाकतात. कुटुंबाची हलाखीची परिस्थिती पाहता करणने ठरवलं होतं की तो आपल्या कुटुंबाचा आधार बनेल. आई- वडिलांना आरामाचे आयुष्य देण्यासाठी प्रचंड मेहनत आणि अभ्यास करून मोठा अधिकारी होण्याचं स्वप्न त्याने बाळगलं होतं.पण, शिक्षणासाठी जास्त पैसे लागतात. मात्र, कुटुंबाची मध्यमस्वरूपाची परिस्थिती असल्याने वडिलांच्या हाताला हातभार लावण्यासाठी तो कॉलेज करून शेतात कीटकनाशक फवारणीसाठी जायचा.नेहमीप्रमाणे आजही तो कॉलेज करून शेतात फवारणी करण्यासाठी जात होता. फवारणी करण्यासाठी जात असताना तो ट्रॅक्टरवरील बाजूच्या जागेवर बसला होता. मात्र, जाता - जाता ट्रॅक्टरचे चाक एका दगडावरून गेल्याने त्याचा तोल जाऊन तो खाली पडला आणि चाकाखाली दबल्यानं त्याचा जागीच दुर्देवी मृत्यू झाला. घरच्या परिस्थितीचा विचार करून आई, बाबा आणि भावाची असलेल्या जबाबदारीची जाणीव त्याला होती. करण हा घरात लहान होता, तो स्वभावाने अत्यंत नम्र होता. करणच्या मृत्यूमुळे गावात एकच हळहळ व्यक्त केली जाते आहे.

---

# शिवरायांच्या गड-किल्ल्यांना जागतिक वारसा मिळवून देण्यात मोलाचा वाटा, मुख्यमंत्र्यांकडून विशेष गौरव...


**ठाणे :** युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले समाविष्ट होण्याच्या प्रक्रीयेमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाला पहिला छत्रपती शिवाजी महाराज महावारस पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. मुंबई येथे मंगळवार ५ ऑगस्टला पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार या शानदार सोहळ्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. महासंघाच्या वतीने महासंघाचे अध्यक्ष ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे, कार्याध्यक्ष हृषिकेश यादव आणि माधव फडके यांनी हा पुरस्कार स्वीकारला.युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडू येथील १ असे एकूण १२ किल्ले समाविष्ट होण्याच्या प्रक्रियेत अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाने या सर्व किल्ल्यांचे टू द स्केल मॉडेल (प्रतिकृती) तयार केले. या १२ प्रतिकृतींपैकी २ प्रतिकृती सांगली येथे तर १० प्रतिकृती मुंबई येथे अत्यंत विक्रमी वेळेत म्हणजेच



अडीच महिन्यात तयार करण्यात आल्या आहेत. याकरिता महासंघाच्या सदस्यांनी प्रत्यक्ष किल्ल्यांवर जाऊन तिथल्या वास्तूंची मोजमापे घेतली व त्यानुसार त्यांचे छोट्या आकारातील प्रमाण ठरवण्यात आले.या प्रतिकृती मागील वर्षी दिल्ली येथे भारत मंडपम मध्ये पार पडलेल्या सांस्कृतिक प्रदर्शनामध्ये प्रदर्शित केल्या गेल्या. यावेळी वेगवेगळ्या देशांमधील सदस्यांनी या प्रतिकृतींचे कौतुक केले. याचसोबत युनेस्कोचे आलेले शिष्टमंडळही अत्यंत प्रभावित झाले होते. महासंघाने अनेक किल्ल्यांवर स्वच्छता मोहीमही राबविल्या. याबद्दल हा पहिला छत्रपती शिवाजी महाराज महावारस पुरस्कार २०२५ महासंघाला प्रदान करण्यात आला आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व सन्मानार्थ तीन लाख रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. याप्रसंगी मंचावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिषजी शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा, अप्पर मुख्य सचिव विकासजी खारगे, सांस्कृतिक कार्य सचिव किरण कुलकर्णी, तेजसजी गर्गे (संचालक पुरात्व विभाग) आणि इतर मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्रातील सर्व शिवप्रेमी, दुर्गप्रेमी गिर्यारोहक स्वयंसेवकांच्या कार्याचा गौरव या निमित्ताने झाला व हा पुरस्कार गडकोटांसाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्व संस्था व दुर्गप्रेमींचा आहे अशी भावना महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे यांनी व्यक्त केली. याचसोबत या पुरस्कारामुळे या सर्व किल्ल्यांचे भविष्यकाळात आणखी चांगल्या प्रकारे जतन करणे व त्यांचे पावित्र्य राखणे ही जबाबदारी अजून अधिक वाढल्याचे महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष हृषिकेश यादव यांनी सांगितले.

# त्यामध्ये अवंतिकाचा अत्याचार... बाहुबली सिनेमातील इंटिमेट सीनवर तमन्ना भाटियाने सोडलं मौन...

**मुंबई** - तमन्ना भाटिया सध्या चर्चेत आहे. तमन्ना, एसएस राजामौली यांच्या बाहुबली द बिगिनिंग मध्ये दिसली होती. हा चित्रपट २०१५ मध्ये प्रदर्शित झालेला. या चित्रपटात प्रभास मुख्य



भूमिकेत होता. चित्रपटात एका सीन होता, ज्यामध्ये प्रभास तमन्नाचे कपडे काढून तिचा नैसर्गिक मेकअप करताना दिसला होता. या सीनमुळे तमन्ना वादाच्या भोवऱ्यात सापडलेली. प्रेक्षकांनी तमन्ना आणि प्रभासवर टीकाही केली. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीदरम्यान तमन्नाने या सीनवर मौन सोडलं असून सद्यस्थिती सांगितली आहे.तमन्नाने नुकतीच द लल्लनटॉपला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान तिनं बाहुबली या सिनेमातील रोमॅंटिक सीनबद्दल भाष्य केलं आहे. या सीनबद्दल गैरसमज झाला असल्याचं अभिनेत्रीनं सांगितलंतमन्नाने सांगितलं की, तो सीन जबरदस्तीने किंवा इतर कोणत्याही गोष्टीने बनवलेला नव्हता, तर शिवेंदु अवंतिकाला स्वतःला शोधण्यास मदत करतो असं दाखवण्यात आलं होतं. अवंतिकाचं आयुष्य कठोर बनलं होतं, शिवेंदु तिला स्वतःला शोधण्यात मदत करतो. प्रेक्षक त्यांच्या मानसिकतेमुळं अशा सीनचा चुकीचा अंदाज लावतात. तमन्ना म्हणाली, हा प्रेक्षकांचा दृष्टिकोन होता. आता हा त्यांचा दृष्टिकोन आहे. ते सर्व काही त्याच पद्धतीने पाहतात. तुम्ही जे काही दाखवलं आहे, ते सर्वात शुद्ध दाखवा. जर एखाद्याला वाटत असेल की सेक्स ही चुकीची गोष्ट आहे, तुमचं शरीर चुकीची गोष्ट आहे, तर त्याला फक्त तेच दिसेल. कारण तो त्याचा दृष्टिकोन आहे. त्याची विचारसरणी. एक चित्रपट निर्माते तुम्हाला खूप सुंदर काहीतरी दाखवू इच्छितो पण तुम्हाला काहीतरी वेगळंच काहीतरी दिसतं.तमन्ना पुढे म्हणाली, मला वाटत नाही की मी याचं टेन्शन घेतलं पाहिजे. कारण आम्ही क्रिएटिव्ह लोक आहोत, मला वाटत नाही की त्या सीनमध्ये अवंतिकाचा बलात्कार होता. यामध्ये, अवंतिका स्वतः ला शोधत होती. तमन्ना म्हणाली की, त्यामुळे प्रेक्षकांनी जज न करता त्या सीनचं महत्व समजून घ्यावं.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसारच महादेवी हत्तीणीचे वनतारामध्ये पुनर्वसन



**कोल्हापूर :** महादेवी हत्तीणीबाबत मध्यंतरी फार गैरसमज पसरवले जात होते. ते दूर करण्यासाठी वनताराने सत्य परिस्थिती स्पष्ट केली आहे. कोल्हापूरमधील एका मठातून महादेवी उर्फ माधुरी या हत्तीणीला वनतारा येथे हलवण्याबाबत मोठ्या प्रमाणावर गैरसमज पसरले आहेत. यासंदर्भातील सत्य परिस्थिती वनताराच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केली आहे. वनताराच्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार, पेटा या विख्यात प्राणिमित्र संघटनेने सन २०२२ पासून या हत्तीणीची माहिती घेतली होती. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी पेटाने वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय समितीकडे यासंदर्भात सविस्तर तक्रार केली. या तक्रारीसोबत या हत्तीणीची अवस्था दाखविणारी छायाचित्रे, पशुवैद्यक तज्ञांचे अहवाल, तिला झालेल्या शारीरिक दुखापती आणि तिची मानसिक अवस्था तसेच, तिचा व्यापारी हेतूने अवैध प्रकारे वापर होत असल्याबाबतचे तपशील आणि पुरावे देखील जोडले होते.या हत्तीणीला २०१२ पासून ते २०२३ पर्यंत तेरा वेळा महाराष्ट्रातून तेलंगणामध्ये, बहुतांश वेळा वनखात्याच्या योग्य, रीतसर परवानगीशिवाय नेण्यात आले होते. ८ जानेवारी २०२३ रोजी तेलंगणा वनखात्याने यासंदर्भात वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या कलम ४८ ए आणि ५४ नुसार, वन्यजीव गुन्हा, पीओआर क्रमांक १२-०७/२०२२-२३ नोंदवला. सार्वजनिक मिरवणुकीत या हत्तीणीला अवैधरीत्या सहभागी केल्याबद्दल हत्तीणीचा माहुत इस्माईल याच्याविरुद्ध हा गुन्हा नोंदवण्यात आला. नंतर यासंदर्भात २५ हजार रुपये भरल्यानंतर आणि गुन्हा कबूल केल्यानंतर या प्रकरणात तडजोड झाली आणि हत्तीणीचा ताबा कोल्हापूर येथील स्थानिक माहुताकडे सोपवण्यात आला.

या हत्तीणीचा वापर व्यापारी तत्त्वावर करण्यात येत होता, असेही पेटाच्या अहवालातून आणि छायाचित्रांमधून स्पष्ट झाले. मोहरमसह अन्य सार्वजनिक मिरवणुकांमध्ये तिला सहभागी केले गेले होते. तसेच भीक मागण्यासाठी देखील तिचा वापर करण्यात आला होता. तिच्या सोंडेवर लहान मुलांना बसवण्यात येत होते आणि कायद्याने बंदी असलेल्या धातूच्या अंकुशाचा वापर करून तिच्यावर नियंत्रण ठेवले जात होते. आणखी एक धक्कादायक प्रथा म्हणजे या हत्तीणीची पूजा करण्याची संधी मठातर्फे बोली लावून विकली जात होती. त्यामुळे या हत्तीणीचा वापर पैशांसाठीही केला जात होता हे दिसते. सन २०१७ मध्ये या हत्तीणीमुळे मठाच्या प्रमुख पुजाऱ्यांनाही जीवघेणी दुखापत झाली होती. त्यामुळे दीर्घकालीन सुरक्षाविषयक मुद्दाही उपस्थित झाला होता.१२ ऑगस्ट २०२३ रोजी स्थानिक पोलिसांनी लिहिलेल्या पत्रानुसार सरकारी पशुवैद्यक डॉक्टरांनी या हत्तीणीची तपासणी केली आणि तिच्या शरीरावर असलेल्या खुल्या जखमा, तिच्या पायाच्या तळव्याची झालेली झीज, तिचा पांगळेपणा तसेच तिची बिघडलेली मानसिक अवस्था यांसंदर्भात अहवाल दिला. २० ऑक्टोबर २०२३ रोजी ह्युॲनिमल राहतफ या संघटनेचे डॉक्टर राकेश चित्तोरा यांनी सविस्तर वैद्यकीय अहवाल देऊन या हत्तीणीला रुग्णालयात ठेऊन, तिची नीट सुश्रुषा आणि पुनर्वसन व्हावे असे सांगितले. हत्तींची काळजी घेण्याबाबतचे प्राथमिक ज्ञानही तिच्या माहुताला नाही, असेही त्यांनी अहवालात नमूद केले होते. या कागदपत्रांच्या आधारे उच्चस्तरीय समितीने याबाबत चौकशी सुरू केली. मात्र सुरुवातीला त्यांनी संबंधित मठाला हत्तीणीची अवस्था सुधारण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी (जून २०२४) पासून दिला. जून आणि नोव्हेंबर २०२४ मध्ये या हत्तीणीची पुन्हा पाहणी आणि तपासणी केल्यानंतर असे आढळले की, तिच्या अवस्थेत केवळ वरवरच्याच सुधारणा केल्या / झाल्या आहेत. मात्र तिच्यावरील उपचार आणि तिचे हित याबाबत अजूनही गांभीर्याचा अभाव आहे, असेही त्यात आढळले. २७ डिसेंबर २०२४ रोजी उच्चस्तरीय समितीने आदेश देऊन या हत्तीणीला जामनगरच्या आर के टी ई डब्ल्यू टी मध्ये स्थलांतरित करण्याचा आदेश दिला. येथे प्राण्यांसाठी नैसर्गिक अधिवास, पशुवैद्यक तज्ञांमार्फत काळजी, कळपातील आपल्या जातीच्या अन्य प्राण्यांमध्ये मिसळण्याची संधी तसेच विशेष प्रशिक्षित माहुत, अशा अनेक सोयीसुविधा आहेत.या हत्तीणीला आपल्याकडे आणण्यात किंवा तशी मागणी करण्यात वनताराने काहीही भूमिका बजावली नाही. हत्तींचे हित तसेच त्यांची काळजी घेण्यातील वनताराची क्षमता आणि त्यांचा पूर्वानुभव लक्षात घेऊन उच्चस्तरीय समितीनेच या हत्तीणीला वनतारामध्ये पाठवण्यास सांगितले होते. मठाने या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र मठाची याचिका सविस्तर सुनावणीनंतर १६ जुलै २०२५ रोजी फेटाळण्यात आली. उच्चस्तरीय समितीचा निर्णय वैध असल्याचे न्यायालयाने नमूद केले आणि धार्मिक प्रथा परंपरांपेक्षाही हत्तीणीचे हित महत्त्वाचे आहे, या मुद्यास न्यायालयाने प्राधान्य दिले. सर्वोच्च न्यायालयाने देखील २८ जुलै २०२५ रोजी उच्च न्यायालयाचा हा निर्णय वैध ठरवला आणि दोन आठवड्यात या हत्तीणीला वनतारामध्ये हलवावे असा आदेश दिला. आता या आदेशाची पूर्तता कशाप्रकारे करण्यात आली हे पाहण्याकरता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात ११ ऑगस्ट २०२५ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

त्यामुळे त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी या हत्तीणीला वनतारामध्ये हलवले आहे आणि वनताराने फक्त न्यायालयांच्या आदेशाचे पालन केले आहे. वनताराचे प्रवर्तक कुटुंब फक्त वनताराच्या समाजसेवेला पाठबळ देते. वनताराच्या रोजच्या कारभारात प्रवर्तक कुटुंबाचा कोणताही सहभाग नसतो. तसेच या संपूर्ण कायदेशीर प्रकरणात प्रवर्तक कुटुंब कोठेही, कोणत्याही टप्प्यात पक्षकार नव्हते किंवा सहभागी नव्हते.

एवढे सबळ पुरावे असूनही तसेच न्यायालयांच्या अंतिम आदेशानंतरही आपल्याला हत्तीचा ताबा मिळायला हवा असे मठाला वाटत असेल तर त्यांनी तशी विनंती सर्वोच्च न्यायालयाकडे केली पाहिजे. तशी कृती न करता वनतारावर दोषारोप करण्यात काहीही अर्थ नाही. जर न्यायालयाच्या आदेशानंतरही मठाने या हत्तीणीला वनतारामध्ये हलवले नसते, तर त्यांच्यावरच न्यायालयाच्या अवमानाची कारवाई झाली असती, अशी वनताराच्या व्यवस्थापनाचीयाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर लढा झाल्यानंतरही वनतारा आणि त्यांच्या सहाय्यकांबाबत गैरसमज पसरवण्याची मोहीम सुरू झाली आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण ऐकून त्यावर अंतिम निर्णय दिला आहे. त्यानंतरही, ज्या एका एका तटस्थ पक्षकाराने केवळ न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले, त्याच्यावर शाब्दिक हल्ले करणे हे फक्त अयोग्यच नाही तर तर न्यायालयीन प्रक्रियेवरील लोकांचा विश्वास डळमळीत करण्यासारखे आहे. कायदा मानणाऱ्या कोणत्याही समाजात न्यायालयाचा अंतिम आदेश पाळणे हे सर्वसामान्य नागरिकाकडून अपेक्षित आहे. हे तत्व येथे देखील लागू होते. कायदेशीररित्या आणि नीतीतत्त्वानुसार प्राण्यांची काळजी घेण्यास आम्ही बांधील आहोत आणि या प्रकरणात आम्ही फक्त न्यायालयीन आणि नियामकांच्या आदेशानुसारच वागलो आहोत,असा पुनरुच्चार वनताराच्या व्यवस्थापनाने केला आहे.

# आमदार डॉ. संजय कुटे यांच्या मातोश्रींचे निधन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली कुटे कुटुंबियांची सांत्वनपर भेट

जनसंचलन/बुलढाणा

माजी मंत्री तथा जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांच्या मातोश्री स्व. उर्मिला श्रीराम कुटे (वय ८१) यांचे निधन झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जळगाव जामोद येथील निवासस्थानी भेट देत स्व. उर्मिला कुटे यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉ.कुटे यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर,आमदार डॉ. संजय कुटे व त्यांचे कुटुंबिय, विभागीय उपायुक्त अजय लहाने, अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरिक्षक रामनाथ पोकले, उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार, प्र.पोलीस अधीक्षक



श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उप विभागीय अधिकारी शैलेश काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय नेहरू हॉकी कप स्पर्धा संपन्न


जनसंचलन/बुलडाणा

: जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा हॉकी संघटना व सहकार विद्यामंदिर बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय नेहरू हॉकी कप स्पर्धेचे आयोजन सहकार विद्यामंदिर, बुलढाणा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १५ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटांमध्ये जिल्ह्यातील एकूण १४ संघांनी सहभाग घेतला. तीनही गटांमध्ये झालेल्या रंगतदार सामने आणि उत्कट सहभागामुळे स्पर्धा अतिशय यशस्वी ठरली.

या स्पर्धेमध्ये प्रत्येक सामन्या मधून उत्कृष्ट खेळाडूला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेमधून विविध गटामध्ये उत्कृष्ट खेळाडूं, विजयी व उपविजयी संघाना चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे बक्षीस वितरन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर, सहकार विद्या मंदिर स्कुलचे मुख्याध्यापक अरुण पवार तसेच जिल्हा हॉकी संघटनेचे



सचिव प्रकाश खेत्रे, सहकार विद्या मंदिरचे क्रीडा प्रमुख सय्यद अबिद, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे अधिकारी डॉ.मनोज निकस, जिल्हा फुटबॉल संघटनेचे सदस्य सुनिल जोशी, राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जीवन मोहोड, सहकार विद्या मंदिरचे हॉकी प्रशिक्षक पुजांजी होन यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पंच म्हणून सय्यद अबिद, प्रकाश खेत्रे, पुंजाजी होन, निलेश पवार, जयश्री शिंदे, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयाचे ज्ञानेश्वर पंखुले व गणेश साबळे यांनी प्रमुख भुमिका बजावली. स्पर्धेमधून विविध गटामध्ये खालील उत्कृष्ट खेळाडुंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.




# भारतीय डाक विभागाची दीन दयाल फिलॅटेली शिष्यवृत्ती योजना; विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावा

जनसंचलन/बुलडाणा

भारतीय डाक विभागामार्फत देशभरातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये टपाल तिकीट संकलन ( ) या छंदाला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी दीन दयाल फिलॅटेली शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. विद्यार्थ्यांमध्ये फिलॅटेलीविषयी (टपाल तिकीट संकलन कला) रुची निर्माण व्हावी, या हेतूने ही शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेअंतर्गत भारतभरातून ९२० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असून प्रत्येकी ६ हजार वार्षिक शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे. दीन दयाल शिष्यवृत्ती योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत आपल्या जवळच्या टपाल कार्यालयात संपर्क साधून अर्ज सादर करावा. इयत्ता ६ वी ते ९ वीमधील सर्व शालेय विद्यार्थी शिष्यवृत्तीकरिता पात्र असेल. विद्यार्थ्यांची स्पर्धा व गुणवत्तेच्या आधारे निवड केली जाईल. विद्यार्थ्यांमध्ये पत्रव्यवहार आणि डाक विभागाविषयी जाणीव, आवड व सर्जनशीलता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीबाबत योग्य मार्गदर्शन करून, छंद जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन डाक विभागाचे डाक अधीक्षक गणेश बा. आंभोरे यांनी केले आहे.

# स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन उत्साहात साजरा...

## आरोग्य संवर्धन विषयक मार्गदर्शन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद...

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन म्हणून दरवर्षी १ ऑगस्ट हा दिवस साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय, बुलढाणा येथे आरोग्य संवर्धन या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शन सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कोषागार अधिकारी ऋषिकेश वाघमारे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी पंडीतराव मांडोगडे, निवृत्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रल्हाद ताठे, निवृत्त सहायक संचालक दिनकर बावस्कर आणि संघटनेचे विभागीय अध्यक्ष राजेश वडतकार यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचा एक विशेष आकर्षण म्हणजे आरोग्य संवर्धन विषयक मार्गदर्शन सत्र होय. या सत्रात डॉ. अश्विनी जाधव यांनी दैनंदिन जीवनशैलीतील छोटे-छोटे बदल,




व्यायाम, आहार आणि मानसिक आरोग्य यावरील मार्गदर्शन दिले. चुकीच्या जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या विकारांपासून संरक्षण कसे मिळवावे, याचे सखोल विवेचन त्यांनी केले. कार्यक्रमाला संघटनेचे जिल्हाध्यक्ष व कार्यालय अधीक्षक दीपक सावंत, जिल्हा सचिव गोपाल ढोले, राज्य कार्यकारिणी महिला प्रतिनिधी मिरा ठाकरे, कोषाध्यक्ष सागर बोकडे, सहसचिव किशोर पवळ, सल्लागार संदीप साखरे, मार्गदर्शक प्रकाश पाटील, गणेश साबळे यांच्यासह अनेक सदस्य व स्थानिक अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्था.नि.ले.परिक्षा सहायक संचालक देविदास पाटील यांनी केले. तर सूत्रसंचालन कनिष्ठ लेखापरिक्षक डिगंबर बावस्कर व कनिष्ठ लेखापरिक्षक गोपाल पाफळणारे यांनी आभारप्रदर्शन केले.

# राजकीय तामझाम बाजूला ठेवून आईच्या हस्ते केले हॉटेलचे उद्घाटन!

## युवा पिढीसाठी ठरला अनोखा आदर्शवत उपक्रम...

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी....आईच्या हातचा घास आणि आईच्या हाताने हॉटेलचे उद्घाटन, यापेक्षा मोठं भाग्य कोणतं असेल? ही गोष्ट खरी करून दाखवली आहे बुलढाण्यातील उद्योजक कायस्थ परिवाराने. राजकारण आणि मोठे नेते यांच्याशी पारिवारीक जवळीक असूनही त्यांनी आपल्या आईच्या हाताने हॉटेलचं उद्घाटन केलं.आजकाल हॉटेल, दुकान किंवा कुठल्याही कार्यक्रमाचं उद्घाटन करायचं म्हटलं की राजकारणी नेते आणि व्हीआयपी लोकांना बोलवण्याची प्रथाच झाली आहे. पण या परंपरेला छेद देत कायस्थ यांनी आपल्या आईच्या हाताने हे उद्घाटन करून एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. याबद्दल बोलताना कायस्थ म्हणाले, माझ्या आई वडीलांनी आयुष्यभर खूप कष्ट केले आहेत. आई वडील यांच्या कष्टाशिवाय आम्ही इथपर्यंत पोहोचू शकलो नसतो. त्यामुळे माझ्या आयुष्यातील या महत्त्वाच्या क्षणाचं सेलिब्रेशन तिच्याशिवाय अपूर्ण होतं. आमच्या यशाचं श्रेय तिलाच जातं, त्यामुळे हे हॉटेल तिनेच सुरू करावं अशी आमची मनापासून इच्छा होती. व्हीआयपी लोकांसाठी हा केवळ एक कार्यक्रम असतो, पण आईसाठी हे तिच्या मुलाचं स्वप्न पूर्ण होण्यासारखं आहे.यावेळी कायस्थ यांच्या आई श्रीमती प्रयागबाई देवचंद कायस्थ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, आज माझ्या मुलांनी मला खूप आनंद दिला आहे. एका आईसाठी याहून मोठं सुख दुसरं नाही. माझ्या मुलाचं हॉटेल खूप यशस्वी होवो, हेच माझे आशीर्वाद आहेत.हॉटेलच्या उद्घाटनाचा हा अनोखा प्रसंग पाहून अनेकांना आनंद झाला. तर काही जणांचे डोळे



भरून आले. आणि त्यांनी कायस्थ यांच्या या निर्णयाचं कौतुक केलं. खरंतर, आई-वडील हेच आपल्या आयुष्यातले खरे व्हीआयपी असतात, हे कायस्थ परिवार यांनी पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे.

---

# एलसीबीची धडाकेबाज कारवाई!....

## दिगंबर कपाटे यांचा सिनेस्टाईल पाठलाग तीन अट्टल गुन्हेगारांना उचलले!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा (हॅलो बुलढाणा) पेट्रोलिंग करीत असताना देऊळगाव राजा येथे ज्वेलर्स दुकान व घरफोडी, मोटरसायकल चोरीचे गुन्हे दाखल असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला बुलढाणा एलसीबी पथकाने ताब्यात घेतले असता, त्याने ४ अट्टल गुन्हेगारासह गुन्हे केल्याची कबुली दिली असून, ३ गुन्हेगारांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या आदेशाने ५ ऑगस्ट रोजी देउळगांव राजा येथे पेट्रोलींग करतांना सदर कारवाई करण्यात आली.रेकॉर्डवरील आरोपी हिरासिंग बावरी रा. देऊळगाव राजा, जिल्हा बुलढाणा याने त्याच्या साथीदारांसह बुलढाणा जिल्ह्यामध्ये ज्वेलर्स चे दुकान, घरफोडी, मोटार सायकल चोरीचे गुन्हे केले आहे, अशी माहिती पथकाला देण्यात आली होती. दरम्यान सापळा रचून पथकाने हिरासिंग बावरी याचा देऊळगांव राजा शहरामध्ये शोध घेतला असता तो सरकारी दवाखान्या जवळ दिसला. दरम्यान तो पोलिसांना पाहून पळून जातांना हेड कॉन्स्टेबल दिगंबर कपाटे यांनी त्याचा पाठलाग करून गीतांजली टॉकीज समोरील नंदन एजन्सी समोर हिरासिंग मोहनसिंग बावरी याला पकडले. त्याला विश्वासात घेवून पंचासमक्ष बुलढाणा




जिल्हयातील ज्वेलर्सचे दुकानातील चोरी, घरफोडी, दूचाकी चोरी बाबत सखोल विचारपुस केली असता त्याने पंचासमक्ष त्याच्या साथीदारांसह विविध गुन्ह्याची कबुली दिली. मेहकर येथे कलम ३०५ (अ), ३३४ (१) बी.एन.एस. तसेच मेहकर १७४/२०२५ कलम ३०५ (अ), ३३४ (१) बी.एन.एस.व देऊळगाव राजा २५१/२०२५ कलम ३३४ (१), ६२ बी.एन.एस. असे गुन्हे आरोपींवर दाखल आहेत.या गुन्ह्यात गुन्हेगार सतनामसिंग ऊर्फ अजयसिंग चंदासिग बावरे रा. देऊळगांव राजा, तकदिरसिंग टिटुसिंग रा. जालना, रोशनसिंग बबलुसिंग टाक रा. संजय नगर दे. राजा, धर्मदरसिंग टाक रा.बीबी, जोगीदरसिंग रणजितसिंग टाक रा. वसमत यांचा सहभाग आहे. या ५ आरोपीपैकी हिरासिंग मोहनसिंग बावरी वय २० वर्ष, रा सरकारी दवाखान्याचे मागे देऊळगाव राजा, सतनामसिंग ऊर्फ अजयसिंग चंदासिग बावरे वय ३८ वर्ष रा देऊळगांवराजा, रोशनसिंग बबलुसिंग टाक वय २० वर्ष रा. संजय नगर दे. राजा या तीन्ही आरोपींना ताब्यात घेवून पुढील कायदेशिर कारवाई करिता वैद्यकीय तपासणी करून पोलीस स्टेशन मेहकर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# धाडसी तुकाराम मुंढेंची दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी बदली झाल्याने बोगस दिव्यांगांचा थरथराट!

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या २० वर्षांच्या कार्यकाळात तुकाराम मुंढे यांची २३ वी बदली आहे. त्यांच्या बदलीमुळे दिव्यांग कल्याण विभागातील खाबुगिरीला आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.त्यांच्या या बदलीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील बोगस दिव्यांगाचे धाबे दणाणले आहेत. राज्यातील धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. तुकाराम मुंढे यांची असंघटीत कामगार विभागाच्या आयुक्तपदावरून बदली करण्यात आली असून ते आता राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असतील. प्रशासनात काम करताना नियमांवर बोट ठेवून काम करणारे तुकाराम मुंढे हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांना पंसत नसल्याचे दिसून येते. बुलढाणा जिल्ह्यात अनेक बोगस लाभार्थी लाभ घेत आहेत.मात्र त्यांना ते न्याय मिळवून देतील. राजकीय नेतृत्वाला, मंत्र्यांना आपल्या मनाप्रमाणे नियमबाह्य गोष्टी करण्यामध्ये तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी अडथळे ठरतात. त्यामुळे नियमानुसार सर्वसाधारणपणे तीन वर्षात बदली होणे अपेक्षित असताना तुकाराम मुंढे मात्र सरासरी एक वर्षे च काम करताना दिसून येतात.तुकाराम मुंढे हे २००५ बॅचचे अधिकारी असून गेल्या २० वर्षांच्या कालावधीत त्यांची ही २३ वी बदली ठरली आहे. दिव्यांग कल्याण विभाग तसा दुर्लक्षित विभाग असल्या च्या शेकडो तक्रारी आहेत. मात्र तुकाराम मुंडे हे या खात्याचे सचिव म्हणून काम करणार आहेत. त्यामुळे आपल्या साध्यासुध्या कामासाठी फेऱ्या मारणाऱ्या दिव्यांग बांधवांची प्रशासनाच्या लालफितीच्या कारभारातून सुटका होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८